महाराष्ट्रशासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
DISTRICT DEPUTY COMMISSIONER OF ANIMAL HUSBANDR
BADA BAZAR, NEAR GENERAL HOSPITAL, BHANDARA- 441904
Email- ddcah.bhandara1@gmail.com Phone No:-0718-252413

## जाहीर लिलाव

निरुपयोगी द्रवनत्रपात्रे खरेदी करणाऱ्या इच्छुक व्यक्ती/कंपनी/खरेदीदार यांना सूचित करण्यात येते कि, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, भंडारा या कार्यालयाची निरुपयोगी/ निर्लेखित केलेली खालीलप्रमाणे विविध आकाराची/ क्षमतेची द्रवनत्र पात्रे जाहीर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहेत. इच्छुकांना सदर द्रवनत्रपात्रे पहावयाची असल्यास कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. लिलावाच्या अटी व शर्ती खात्याच्या संकेत स्थळावर www.ahd.maharashatra.gov.in तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, भंडारा येथे उपलब्ध आहेत. लिलावाच्या साहित्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लिलावाचा दिनांक | द्रवनत्रपात्राचा प्रकार | संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 30.05.2025 | BA 1.5 | 10 |
| 2 | | BA3 & IR3 | 68 |
| 3 | | IN50 | 11 |
| 4 | | TA55 | 37 |
| | | एकूण | 126 |

त्याकरिता दिनांक. 30.05.2025 रोजी सकाळी 12.00 वाजता जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र ,भंडारा येथे जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. ज्या संस्था/व्यक्ती/कंपनी/व्यापारी सदर लिलावात भाग घेणेसाठी इच्छुक असतील त्यांनी राष्ट्रीयकृत बँकेचा रु. 10,000/- (रु.दहा हजार फक्त) चा धनाकर्ष जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, भंडारा यांचे नावे (Payable at Bhandara) सादर करणे अनिवार्य आहे. लिलाव प्रक्रियेदरम्यान जाहीर लिलावाबाबतचा अंतिम निर्णय मा. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, भंडारा यांचे अध्यक्षतेखाली गठित करण्यांत आलेल्या निर्लेखन समितीचा राहील. लिलावानंतर हस्तांतरित करावयाची द्रवनत्रपात्रे ही चेपून मगच हस्तांतरित करण्यात येईल, जेणेकरून त्यांचा पुर्नवापर होणार नाही.

सही/-
(डॉ. अन्नु वरारकर)
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
भंडारा

Scanned with OKEN Scanner

**जाहीर लिलाव अटी व शर्ती**

1. निर्लेखित द्रवनत्रपात्रांचा जाहीर लिलाव दिनांक 30.05.2025 रोजी दुपारी ठीक 12.00 वाजल्यापासून सुरु होईल.
2. लिलावात भाग घेण्यासाठी लिलावधारकाने कार्यालयात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, भंडारा यांचे नावे रू. 10,000 चा धनाकर्ष अनामत रक्कम म्हणून सादर करणे अनिवार्य आहे.
3. सदर अनामत रकमेचा धनाकर्ष लिलाव धारकास लिलाव अयशस्वी झाल्यास परत करण्यात येईल.
4. यशस्वी लिलाव धारकास लिलावाची पुर्ण रक्कम भरल्यानंतर अनामत रकमेचा धनाकर्ष परत करण्यात येईल.
5. लिलावाची बोली ही. रू. 1000/- च्या पटीत राहील.
6. लिलावातील द्रवनत्रपात्रे लिलावात भाग घेणा-यांनी अगोदर पुर्ण पाहुन घ्यावीत नंतर कोणतीही तक्रार . चालणार नाही.
7. ज्या व्यक्तीची बोली सर्वात जास्त असेल व ती बोली समितीस मान्य असल्यास त्या बोलीधारकाच्या नावे तीन वेळा पुकारा करुन लिलाव सोडण्यात येईल. लिलावात तीन वेळा पुकारल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल.
8. लिलाव ज्या व्यक्तीचे नावे सोडण्यात येईल त्या व्यवतीने द्रवनत्रपात्रांची संपुर्ण किंमत लिलाव झाल्यानंतर त्याच दिवशी भरून दोन दिवसाचे आत द्रवनत्रपात्रे उचलणे अनिवार्य आहे अन्यथा त्यानंतर रु. 500/- प्रतिदिन शुल्क आकारण्यात येईल. व एका आठवडयाचे आंत द्रवनत्रपात्रांची उचल न केल्यास लिलावधारकाची अनामत रक्कम जप्त करण्यातयेईल.
9. द्रवनत्रपात्रे चेपून घेण्याची जबाबदारी हि लिलावधारकाची राहिल व चेपल्याशिवाय सदर द्रवनत्रपात्रे हस्तांतरित करण्यात येणार नाहीत.
10. क्रमांक 1 च्या बोली धारकाने पैसे न भरल्यास नंतरची जास्त बोली बोललेल्या लिलावधारकास ग्राहय समजले जाईल व त्यास द्रवनत्रपात्रांची रक्कम क्र. 1 च्या बोलीधारकाच्या बोलीप्रमाणे भरावी लागेल.
11. लिलाव झालेल्या संपुर्ण द्रवनत्रपात्रांची रक्कम भरणा झाल्यानंतर त्यांची कुठलीही जबाबदारी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, भंडारा कार्यालयाची राहणार नाही त्याची संपुर्ण जबाबदारी खरेदीधारकाची /लिलावधारकाची राहील.
12. लिलावात घेतलेली द्रवनत्रपात्रांची वाहतुकीची सोय लिलावधारकास स्वत: करावी लागेल.
13. सदर अटींचे उल्लंघन करण्या-यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्या व्यक्तीस पुढील लिलावात भाग घेता येणार नाही. तसेच त्या लिलावातील द्रवनत्रपात्रांवर हक्क सांगता येणार नाही. लिलाव समिती लगेच फेर लिलाव करण्यास मुक्त राहील.
14. लिलावास अंतिम मंजुरी देणे, लिलाव नाकारणे अथवा लिलाव प्रक्रियेस स्थगिती देणे याचा संपुर्णअधिकार लिलाव समितीने राखुन ठेवला आहे. समितीचा निर्णय लिलावात भाग घेणा-यांवर बंधनकारक राहील. लिलावात होणा-या कोणत्याही वादात लिलावसमिती अध्यक्षांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्वांना बंधनकारक राहील.
15. कोणतेही कारण न दाखविता लिलाव समिती अध्यक्षास लिलाव रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आलेले आहेत.

AWaradkar

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
भंडारा

Scanned with OKEN Scanner